23 MAY 2018

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ पाण्याबाबतीत स्वयंपूर्ण

## विहिरी, शेततळी, तलावाच्या माध्यमातून एकूण ३० कोटी लिटर पाणीसाठा

अहिल्या परकाळे

कोल्हापूर

महाराष्ट्राला उन्हाच्या झळा पोहचत असल्या तरी शिवाजी विद्यापीठाने २००२ पासून पाणी व्यवस्थापन केल्याने आज जलव्यवस्थापनात विद्यापीठ स्वयंपूर्ण ठरले आहे. विद्यापीठ परिसरातील विहिरी, तलाव आणि शेततळयातील पाणी प्रशासन, विद्यार्थी, गार्डन विभागासह प्रयोगशाळेलाही वर्षभर पुरते. त्यामुळे महानगरपालिकेच्या पाण्याचे दरमहा येणाऱ्या ७ लाख रूपये बीलाची बचत करून ती रक्कम विकासावर खर्च केली जाते. जलसंधारणच्या माध्यमातून नैसर्गिकरित्या पडलेल्या पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन केल्यामुळे दुष्काळजन्य परिस्थितीतही पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे.

शासन निर्देशानुसार सामाजिक वनीकरण विभागाने झाडे लावून ती तीन वर्षे जगवण्यासाठी विद्यापीठाकडे जागेची मागणी केली होती. शासनाच्या योजनेला प्रतिसाद म्हणून विद्यापीठातील सिंथेटीक ट्रॅक परिसरातील जवळपास २५ एकर जागेत १० हजार झाडे लावण्याचे नियोजन केले आहे. झाडे लागवडीसाठी माती काढताना जुन्या शेततळ्याच्या वरच्या भागात व शिंदे विहीरीच्या बाजूला खुदाई केल्याने नवीन दोन शेततळे निर्माण झाले आहे. पुर्वीच्या तीन किलोमिटर लांबीच्या चरीची स्वच्छता करून भाषाभवन पाठीमागील तळ्यात पाणीसाठा करण्यात येणार आहे. तंत्रज्ञान अधिविभागाजवळील 'शिवटाकी" या मोठ्या नवीन विहिरीच्या पाण्याचा वापर करण्यास विद्यापीठाने सुरूवात केली आहे. त्यामुळे भाषा भवन तलावातील पाणीसाठा संपला तरी यावर्षी विद्यापीठाला पाणीपुरवठा कमी पडलेला नाही. शासनाच्या वतीने करण्यात येणारे वृक्षारोपण विद्यापीठाच्या जलयुक्त विद्यापीठ प्रकल्पाला पूरक ठरणार आहे. वृक्ष रोपणासाठी खुदाई केलेल्या चरीच्या माध्यमातूनही पाण्याचे नेटके नियोजन करून, जादाचे पाणी भाषा भवन तलावात वळवण्यासाठी चर खोदली आहे. शाहू नाक्यापासून ते विद्यापीठाच्या मुख्य प्रवेश व्दारापर्यंतचे व दुसऱ्या बाजूने सिंथेटीक ट्रॅक, मुख्य इमारत, परीक्षा भवन, ग्रंथालय परिसरातील पावसाचे पाणी भाषा भवन तलावात जमा होते. तर मुख्य प्रवेशव्दार, राजाराम कॉलेज, कुलगुरूंचे निवासस्थान, ह्युमॅनिटीज बिल्डींग, हेल्थ सेंटर परिसरातील पावसाचे पाणी संगीतशास्त्र विभागामागील तलावात जमा होते. त्यामुळे वर्षभर पुरेल इतका पाणीसाठा विद्यापीठात उपलब्ध आहे. पाणी पाझरू नये याकरिता तलावाच्या भिंतीला काळी मातीचे अस्तरीकरण केले आहे.



- सिंथेटीक ट्रॅकच्या २५ एकर परिसरात करणार १० हजार वृक्षलागवड
- चरीच्या माध्यमातून भाषा भवन मागील तलावात पाणीसाठा

### पाणीसाठा वाढवण्यासाठी प्रयत्नशील

२०१६ पासून पाणी टंचाईकडे गांभीर्याने लक्ष दिल्याने विद्यापीठ पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनले आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रोत्साहनामुळे पाणीसाठा वाढवण्याचे प्रयत्न असून चरीच्या माध्यमातून पाणी साठा वाढवून पाण्याबाबत स्वयंपूर्ण राहण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे

### विहिरी व तलावाच्या माध्यमातून भूपृष्ठात साठवलेला पाणीसाठा

भाषा भवन तलाव :२२ कोटी १५ लाख लिटर

संगीतशास्त्र विभाग तलाव : ५ कोटी २० लाख लिटर

सुतार विहिर :४ लाख लिटर

क्रिडा विभागाजवळील विहीर : ५ लाख लिटर

रसायनशास्त्र विभागाजवळील विहिर : ३ लाख लिटर

सिंथेटीक ट्रॅकजवळील विहिर : ५ लाख लिटर

शिंदे विहीर : ३ लाख लिटर

तीन शेततळी : ४० लाख लिटर

एकूण पाणीसाठा : ३० कोटी लिटर

### विद्यापीठात दोन ऐतिहासिक विहिरी

विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र विभागाजवळ एक तंत्रज्ञान विभागाजवळ एक अशा दोन ऐतिहासिक विहिरी आहेत. त्यांचे बांधकाम १८८३ साली केल्याचे शिलालेख या विहिरीजवळ इंग्रजी व मराठी भाषेत आहेत. तंत्रज्ञान विभागाजवळील विहीरीचा शोध २०१७ मध्ये लागल्याने या विहीरीला 'शिवटाकी" असे नाव दिले आहे.

23 MAY 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

SUK RECEIVES 12K APPLICATIONS | FIGHT AGAINST PLASTIC IS PRIORITY

# Over 1k appear for entrance exams on Day 1

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur's (SUK) online entrance examination for post-graduate and undergraduate courses commenced from Tuesday across the division. Officials said around 12,000 applications have been received for over 20 courses.

Mahesh Kakade, director of the Board of Examinations and Evaluation, the examnination was conducted peacefully on the first day. There was an incident of font error in the Marathi paper of MA geography but it was sorted out.

On Tuesday, the tests were conducted across Sangli, Satara and Kolhapur districts. The subjects for the tests were MSc geography, MA mass communication, MSc alcohol technology, bachelor of journalism, master of journalism, MSc agro chemical and pest management, MSc sugar technology, MSc geology, MSc electronics, BLib and MLib.

Of the 1,243 students who were supposed to appear for the exam on Tuesday, 1,050 have appeared, he said.

Kakade said adue to the overlapping exam scenario of some students, their exam will be conducted separately.



**On Tuesday, the tests were conducted across Sangli, Satara and Kolhapur districts. Of the 1,243 students who were supposed to appear for the exam on Tuesday, 1,050 have appeared**

A different question paper has been prepared and the difficulty level of the paper will remain same as of this paper.

On Wednesday, the faculty exchange examination will be conducted at the varsity premises, Kakade said. This exam will be conducted offline.

SUK officials said the entrance exams will conclude on May 29, while the merit list for all examinations will be declared on June 11. The admission rounds will begin from June 23 and conclude by June 26.

# UGC tells varsities to observe World Environment Day

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked the vice-chancellors across the country to celebrate World Environment Day on June 5 at their universities and affiliated colleges.

The UGC has also suggested a host of activities to choose from on the said day. UGC secretary Rajnish Jain, in a letter dated May 18, said that this year the union government is hosting the World Environment Day at a global level in collaboration with the United Nations Environment Programme. The theme for this year is Plastic Pollution.

"Hosting this prestigious event is a step towards our commitment to undertake global leadership on addressing all forms of pollution, reducing emissions and investing in sustainable development efforts. This is an opportunity for collective efforts to reduce the use of plastic, and encourage the students to refuse, reduce and re-use plastic product in their daily life," he said.

Jain added that the universities, accordingly, are requested to undertake various activities on June 5.

**The Union government is hosting World Environment Day at a global level in collaboration with the United Nations Environment Programme**

**JUNE 5**

The activities suggested are mass awareness on disposal of plastic at the college/university level, along with mini marathon, restricting single use plastic water bottle and encouraging use of refillable bottles instead.

Organising cleanliness drives in municipalities, public awareness through cultural programs and involvement of NCC and NSS students has also been advised under the programme.

Jain has asked the universities to circulate the said letter to all the affiliated colleges and take the appropriate action.

A student from the SUK said, "The mass awareness among students for a clean environment is the need of the hour. It is a good initiative and should fetch good response from the student community."

23 MAY 2018 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पहिल्या दिवशी १०५० जणांची प्रवेश परीक्षा

## ऑनलाईन पद्धत; शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन; आजही परीक्षा होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांना मंगळवारपासून प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी ११ अभ्यासक्रमांसाठी १०५० परीक्षार्थींनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली; तर १९१ जण गैरहजर राहिले. 'एम. ए. फॅकल्टी चेंज' आदी विषयांची परीक्षा आज, बुधवारी सकाळी अकरा ते दुपारी दोन या वेळेत मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे.

शिवाजी विद्यापीठातर्फे या वर्षी ऑनलाईन पद्धतीने २७ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा घेतल्या जाणार आहेत. याअंतर्गत मंगळवारपासून प्रवेश परीक्षांना सुरुवात झाली. पहिल्या दिवशी एम. एस्सी. अल्कोहोल टेक्नॉलॉजी, एम. ए., एम. एस्सी., जिऑग्राफी, एम. ए. मास कम्युनिकेशन, एम. एस्सी. जिओलॉजी, बी. लिब., एम. लिब., एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स, बी. जे., एम. जे., एम. एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, ॲग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी एकूण १२४३ जणांनी नोंदणी केली होती. त्यांपैकी १०५० जणांनी परीक्षा दिली, तर १९१ जण गैरहजर राहिले.



शिवाजी विद्यापीठातर्फे मंगळवारपासून विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांना प्रारंभ झाला. परीक्षार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील, कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील ११ केंद्रांवर सकाळी ९.३० ते अकरा, दुपारी साडेबारा, ते दोन आणि दुपारी साडेतीन ते सायंकाळी पाच अशा तीन सत्रांमध्ये परीक्षा झाली. या परीक्षांमुळे केंद्रांचा परिसर गर्दीने फुलला होता.

### सराव चाचणीची गरज

परीक्षेतील पहिली दहा ते पंधरा मिनिटे ही ऑनलाईन स्वरूपाची माहिती घेण्यात गेली. यात अनेकांचा काहीसा गोंधळ उडाला. विद्यापीठाने ही ऑनलाईन परीक्षा कशा पद्धतीने द्यावयाची याबाबत सराव चाचणी अथवा मार्गदर्शनपर माहिती देणे आवश्यक होते, अशी प्रतिक्रिया परीक्षार्थींनी व्यक्त केली.

### 'जिओग्राफी'ला सर्वाधिक संख्या

परीक्षार्थींमध्ये मंगळवारी एम. ए. अथवा एम. एस्सी. जिऑग्राफीच्या परीक्षार्थींची संख्या सर्वाधिक ३२४ इतकी होती. त्यापाठोपाठ एम. एस्सी. ॲग्रो केमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंटचे १६० परीक्षार्थी होते. एम. लिब.साठी अवघे १५ परीक्षार्थी होते.

23 MAY 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ ऑनलाईन परीक्षा सुरळीत

## तीन जिल्ह्यांत १०५० परीक्षार्थी; १९१ गैरहजर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाची ऑनलाईन प्रवेश परीक्षा मंगळवारी (दि.२२) तीन जिल्ह्यांतील सर्व परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे झाली. नोंदणी केलेल्या १२४३ पैकी १०५० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर १९१ गैरहजर राहिले.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी विविध अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन, ऑफलाईन परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये परीक्षेची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.

एम.ए., एम.एस्सी. भूगोल, एम.ए.मास कम्युनिकेशन, एम.एस्सी. अल्कोहोल टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, एम.एस्सी., अ‍ॅग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट, एम.एस्सी., शुगर टेक्नॉलॉजी, एम.एस्सी.जिऑलॉजी, बी.लिब सायन्स अँड इन्फॉर्मेशन सायन्स व एम.एस्सी.इलेक्ट्रॉनिक्स या विषयांची मंगळवारी शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागासह तीन जिल्ह्यांतील



शिवाजी विद्यापीठातून...

विविध केंद्रांवर ऑनलाईन परीक्षा झाली.

पहिल्या सत्रात ५२७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. यातील ४४९ विद्यार्थी परीक्षेला बसले तर ७८ गैरहजर राहिले. दुसऱ्या सत्रासाठी ३९१ विद्यार्थ्यांची नोंदणी होती, यातील ३२७ जणांनी परीक्षा दिली असून ६४ अनुपस्थित राहिले. तिसऱ्या सत्रासाठी ३२५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी २७४ परीक्षेला बसले ४९ गैरहजर होते, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दिली.

### एम.ए.ची आज परीक्षा

एम.ए.(फॅकल्टी चेंज) ही परीक्षा बुधवारी (दि. २३) सकाळी ११ ते २ यावेळेत शिवाजी विद्यापीठ मानव्यशास्त्र इमारतीमध्ये ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी वेळेत उपस्थित रहावे, असे आवाहन परीक्षा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAY 2018
तरुण भारत

# विद्यापीठाची प्रवेशपूर्व परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विद्यापीठ व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठीची प्रवेश पूर्व परीक्षा तिन्ही जिल्ह्यातील परीक्षा केंद्रात सुरळीत पार पडली. या परीक्षेला तिन्ही जिल्ह्यातून १ हजार २४१ विद्यार्थ्यांपैकी १ हजार ५० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर १९१ विद्यार्थी गैरहजर होते, अशी माहिती परीक्षा विभागातर्फे देण्यात आली.

विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा या तिन्ही जिल्हयात परीक्षा झाली. यामध्ये डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी (कसबा बावडा), भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (मोरेवाडी), डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग(जयसिंगपूर), कोल्हापूर इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी (वारणानगर, ता. पन्हाळा), डिपार्टमेंट ऑफ कॉम्प्युटर सायन्स (शिवाजी विद्यापीठ) या परीक्षा केंद्रावर प्रवेश पूर्व परीक्षा झाली. ३८ विषयांसाठी प्रवेशपूर्व परीक्षा मंगळवार २९ पर्यंत सुरू राहणार आहेत. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमातीमध्ये बुधवार २३ रोजी सकाळी ११ ते दु. २ या वेळेत (एम.ए. फॅकल्टी चेंज) विविध विषयांची परीक्षा होणार आहे. तरी विद्यार्थ्यांनी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
23 MAY 2018 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ प्रवेश परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठच्या आणि संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता प्रवेश परीक्षेस मंगळवारी सुरुवात झाली. विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठी पहिल्या दिवशी १०५० परीक्षार्थी उपस्थित होते. २९ मेपर्यंत ही परीक्षा होणार आहे.

एकूण २४ परीक्षा केंद्रांवर ३८ विषयांकरिता ही परीक्षा सुरू झाली आहे. यामध्ये २७ विषयांकरिता ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेतली असून, ११ विषयांकरिता ऑफलाईन पद्धतीने एम.ए. फॅकल्टी चेंज सैद्धांतिक पद्धतीने विषयाची परीक्षा होणार आहे. ऑनलाईनच्या २७ विषयांकरिता कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण १२ परीक्षा केंद्रे, सांगली जिल्ह्यातील ५, तर सातारा जिल्ह्यातील ६ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा घेतली जात आहे. एकूण १२,१५७ विद्यार्थ्यांचे अर्ज विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. यापैकी ११,४६७ विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा, तर ६९० विद्यार्थी ऑफलाईन परीक्षेस बसणार आहेत. मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये एम.ए., एम.एस्सी., मास कॉम, बी.जे, एम.जे, बी.लिब, एम.लिब आदी अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा घेण्यात आली. यासाठी १२४१ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी १०५० विद्यार्थी परीक्षेस बसले आहेत. बुधवारी एम.ए.ची परीक्षा विद्यापीठाच्या मानव्यविद्या इमारतीमध्ये ११ ते २ वा. या वेळेत ऑफलाईन स्वरूपात होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAY 2018
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन प्रवेश सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन प्रवेश परीक्षेस मंगळवार (ता. २२)पासून प्रारंभ झाला. सर्व परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा सुरळीत पार पडली. एकूण १२४१ परीक्षार्थ्यांनी ह्या साठी नोंदणी केली होती. या पैकी १०५० परीक्षार्थ्यांनी परीक्षा दिली. बुधवारी एम.ए. (फॅकल्टी चेंज) ही परीक्षा शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये ऑफलाइन स्वरुपात होणार आहे. याच बरोबर ऑफलाईन होणाऱ्या सर्वपरीक्षा ह्या मानव्यशास्त्र इमारतीमध्येच होणार आहेत.

जनसंपर्क क[illegible]
शिवाजी विद्यापीठ, कोल्हाप
23 MAY 2018
सकाळ

# शिवाजी विद्यापिठात ऑनलाईन प्रवेश सुरु

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन प्रवेश परीक्षेस मंगळवारपासून प्रारंभ झाला. सर्व परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा सुरळीत पार पडली. एकूण १२४१ परीक्षार्थ्यांनी यासाठी नोंदणी केली होती. यापैकी १०५० परीक्षार्थ्यांनी परीक्षा दिली. बुधवारी एम.ए. (फॅकल्टी चेंज) ही परीक्षा शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये ऑफलाईन स्वरूपात होणार आहे. याचबरोबर ऑफलाईन होणाऱ्या सर्व परीक्षा या मानव्यशास्त्र इमारतीमध्येच होणार आहेत.